# ज्ञान प्रबोधिनी : स्त्री-शक्ती प्रबोधन (ग्रामीण)

## वार्षिक वृत्त

**राष्ट्रीय सौर शके १९४४–४५ (सन २०२२–२३)**

नमस्कार,

करोना छायेतून बाहेर पडताना गेल्या (२०२२-२३) वर्षामध्ये ज्ञान प्रबोधिनीच्या स्त्री शक्ती प्रबोधन ग्रामीण विभागाने जणू स्वयंरोजगाराचा जागर केला! वेगवेगळ्या प्रकल्पात स्वयंरोजगार प्रशिक्षणाची व त्यामुळे निर्माण झालेल्या वस्तूंची विक्री करण्याची संधी घेतली. स्वाधार प्रकल्पातील स्वयंरोजगाराचे काम पासली भागातील ५ दुर्गम गावात होते तर संपदा प्रकल्पासाठीची ९ गावे राजगडाच्या पायथ्याशी होती. शाश्वत प्रकल्पाचा पुढावा ३ गावात होता, तर शिवापूरचे रामसीता तंत्र निकेतन गावोगावच्या महिलांना स्वयंरोजगार प्रशिक्षण देत होते. वेल्ह्यात युवतींना कमावते करण्यासाठी कौशल्य प्रशिक्षण घेतले. त्याच सोबत 'खेळते भांडवल' या प्रकल्पाने नेमक्या वेळेला भांडवल पुरवले तर हरित ऊर्जा प्रकल्पाने स्वयंरोजगाराला एक नवीन दिशा दिली. ग्रामीण भागातली समृद्धी वाढली पाहिजे यासाठीचे प्रयत्न गावोगावच्या प्रतिनिधी जबाबदारी घेऊन तरीही आनंदाने करताना दिसल्या. बचत गटातील महिलांना गटातून मिळालेली कर्जे यंदाही कोटींच्या घरात पोचली.

या सगळ्या निमित्ताने कुटुंबकर्तींच्या माध्यमातून मिळालेले उत्पन्न दखल घेण्यासारखे झाले. या उत्पन्नाचा विनियोग चोख व्हावा म्हणून अर्थसखी प्रकल्प आर्थिक साक्षरता वाढवण्यासाठी केला.

या आर्थिक स्वावलंबना सोबत बाईचे आरोग्य सुधारण्यासाठी आरोग्य सखी प्रकल्पा अंतर्गत आरोग्य तपासण्यांची योजना केली होती. दुर्गम भागातल्या मुलींनी शिकावे म्हणून आपला वेल्हे सहनिवास चालू आहेच. त्याची आणि या वर्षी किशोर-किशोरी विकास आणि युवतींच्या व्यक्तिमत्त्व विकासासाठी कुठल्या उपक्रमांची कशी योजना केली तेही या वृत्तांत वाचायला मिळेल. वंचित गटाच्या विकासासाठी कातकरी वस्तीवरचे काम व एकल महिलांसाठीचे काम यंदाही नियमित झाले. स्त्री शक्ती प्रबोधन विभागाच्या १२ उप-विभागांचे काम यंदाही धूम-धडाक्यात झाले.

**भवितव्य लेख** : ज्ञान प्रबोधिनीच्या कार्यपद्धतीचा एक भाग म्हणजे काम करताना कामाचे १० वर्षांसाठीचे नियोजन करायचे आणि त्यांची नियोजनाप्रमाणे कार्यवाही करायची. तसे यंदा २०२२-३२ या कालावधीसाठी भवितव्य लेख लिहिण्याचे काम केले. गेल्या वर्षी चालू झालेली ही प्रक्रिया या वर्षी पूर्ण झाली. ७२ जणींच्या सहभागाने २८ पानी भवितव्य लेख तयार झाला, छापूनही झाला. आणि आता त्यात लिहिलेल्या नियोजनाप्रमाणे १७० कार्यकर्त्यांचा गट कामालाही लागला!

ग्रामीण महिलेच्या मनालाच काय पण आयुष्याला उभारी देण्याचे काम योजनाबद्ध पद्धतीने सुरू आहे. यातले योजना केलेले एकही काम निधी अभावी थांबले नाही, एवढे अर्थसहाय्य वैयक्तिक देणगीदार व सामाजिक उत्तरदायित्वा अंतर्गत विविध कंपन्यांकडून मिळाले. अशा समाजाच्या आश्वासक पाठिंब्यामुळे विना व्यत्यय काम चालू राहिले, एवढेच नाही तर वाढत गेले असे हे वृत्त वाचल्यावर तुम्हालाही कळेल! वृत्त नक्की वाचा आणि अभिप्राय नक्की कळवा..

- सुवर्णा गोखले, विभागप्रमुख


**♦ ज्ञान प्रबोधिनी संस्थेचे पदाधिकारी ♦**

| अध्यक्ष | उपाध्यक्ष | कार्याध्यक्ष | संचालक |
|---|---|---|---|
| डॉ. रघुनाथ माशेलकर | डॉ. विजय केळकर | डॉ. श. बा./रवि पंडित | डॉ. गिरीश श्री. बापट |
| | कि. बा. (अण्णा) हजारे | | **कार्यवाह** |
| | | | वि. शं./सुभाष देशपांडे |

# ज्येष्ठांचे नियमित मार्गदर्शन

स्त्री शक्ती प्रबोधन विभागामध्ये काम करणाऱ्या गटाला ज्ञान प्रबोधिनीचे संचालक व कार्यवाह यांचे नियमित मार्गदर्शन होते. यासाठी त्या दोघांसोबत सहविचार करणारी मासिक बैठक गेली अनेक वर्ष चालू आहे. या वर्षी निवेदने करण्यासाठी कार्यकर्त्यांनी आपापल्या विषयाची सादरीकरण करून विषय मांडणी केली. जुलै २०२२ ते मार्च २०२३ या काळात खालील विषयानुसार केलेली

*सादरीकरणे*

| दिनांक | विषय | सादरकर्त्या |
|---|---|---|
| २५ जुलै २०२२ | १. मुक्त शिक्षण | तृप्ती कुलकर्णी |
| | २. अर्थ सखी | चित्राली कुंभोजकर |
| २९ ऑगस्ट २०२२ | ३. सहनिवास | रंजिता सरवदे |
| | ४. खेळते भांडवल | आशा सुर्वे |
| २६ सप्टेंबर २०२२ | ५. शिष्यवृत्ती | प्रतिभा स्वामी |
| | ६. एकल महिला | कुंदा खंडाळकर |
| ३१ ऑक्टोबर २०२२ | ७. स्वयंरोजगार (पुणे केंद्र) | राजश्री पवार |
| | ८. राम – सीता पुराणिक तंत्र निकेतन | आशा सुर्वे |
| २४ जानेवारी २०२३ | ९. नेतृत्व प्रकल्प | आशा सुर्वे |
| | १०. संपदा प्रकल्प | सुनीता कारकुड |
| २७ फेब्रुवारी २०२३ | ११. हिरकणी | किर्ती कोंडे |
| | १२. बाल आरोग्य | डॉ. प्राजक्ता दोशी |
| २७ मार्च २०२३ | १३. गरोदर माता तपासणी | शैला भोंडेकर |

- या निमित्ताने कामाच्या विषयाचे संकलन झाले व २० मिनिटाचे सादरीकरण करण्यासाठी पॉवर पॉईंट प्रेझेंटेशन तयार झाले.

### ◆ वेल्हे केंद्रास संचालकांची भेट

मा. संचालकांची वेल्हे केंद्राला त्रैमासिक भेटही असते या वेळी गाव पातळीवर काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची निवेदने संचालक ऐकतात व त्यांना मार्गदर्शन करतात. या वेळी वेगवेगळ्या प्रकल्पात काम करणाऱ्या युवतींची निवेदने आणि जास्वंद वर्गातील युवतींचे मनोगत झाले व संचालकांनी प्रमाणपत्र वाटप केले.

दुसऱ्या भेटीच्या वेळी आरोग्य प्रकल्प निवेदने झाली व सहनिवास युवती गटाला मार्गदर्शन केले.

तर तिसऱ्या भेटीत गावपातळीवरील चालणाऱ्या दलांची निवदने झाली व सुकाणू बैठक सदस्यांची निवदने ऐकून संचालकांनी मार्गदर्शन केले. अशा संवादामुळे काम करणाऱ्या गटाचा उत्साह वाढतो आणि टिकूनही राहतो.

◇◈◇

पुढे दिलेल्या कार्यवृत्तात ज्यांनी जबाबदारी घेऊन काम केले अशा साधारण १७० कार्यकर्त्या कार्यरत होत्या. ५८ बैठकींमधून त्यांनी नियोजन -निवेदन केले. वर्षभरात सगळ्यांनी मिळून साधारण १.२५ कोटी रुपयांची उलाढाल केली. त्यासाठी निधी उभा केला व नियोजनाप्रमाणे खर्चही केला. शिवापूर, नसरापूर, आंबवणे, वेल्हे अशी ४ केंद्रे पुण्याच्या कार्यालयातून नियंत्रित करण्यात आली.

# आर्थिक स्वावलंबन

## ◆ बचत गट ◆

स्त्री शक्ती प्रबोधन (ग्रामीण) या कामाला सुरुवात झाली ती बचतगट उपक्रमाने. गेली ३० वर्षे हा उपक्रम चालू आहे. आता हा उपक्रम जिजामाता प्रबोधन केंद्राचा उपक्रम म्हणून राबविला जातो. सध्या ज्ञान प्रबोधिनीच्या मार्गदर्शनाने चालू असणाऱ्या १९१ बचत गटांपैकी १४१ बचत गटांचा हिशोब केला. त्यात सर्व गटांची मिळून मार्च अखेरची

▷ बचत रु.१,३७,८१,७८०/- केली

▷ कर्ज रु. ३,५५,२३,६७८/- दिले

▷ व्याज रु. ५३,३२,३७७/- जमा झाले.

हे व्याज गट बंद होताना ज्या त्या गटातील सभासदाला वाटप होईल. यामध्ये बँकेने बचत गटाद्वारे दिलेल्या साधारण ५० लाख रुपये कर्जाचा सुद्धा वाटा आहे.

आनंदाची गोष्ट अशी की आपण २२-२५ वर्षे बँकेकडून बचतगटांना कर्ज मिळवून देत आहोत आजपर्यंत काही कोटी रूपयांचे कर्ज वाटप झाले आहे. या पैकी एकही कर्ज बुडीत गेलेले नाही. अनेक गट प्रमुखांनी बँकेचे व्यवहार कसे करायचे हे समजल्यामुळे वैयक्तिक कर्जे घेतली.

आपण चालवलेल्या या बचत गट प्रक्रियेतून बँकेला चोख परतफेड करणारा ग्राहक मिळाला. सातत्याने चालवलेल्या या प्रयत्नांमुळे आपले राष्ट्रीय उत्पन्नातील हे भरीव योगदान आहे.

## ◆ स्वयंरोजगार ◆

**१) भगिनी निवेदिता बचत गटाचे पुण्यातील विक्री केंद्र** : बचत गट व वेगवेगळ्या प्रशिक्षण वर्गात येऊन ज्यांनी उत्पादन केले आहे त्यांचे उत्पादन भगिनी निवेदिता बचत गटाच्या विक्री केंद्राद्वारे विकले जाते. हे विक्री केंद्र उत्पादक महिलांना खूप आधार देते. गेल्या वर्षी रु.१२ लाखांची विक्री या केंद्राद्वारे करण्यात आली. तर वर्षभरात विविध कंपनी व सोसायट्यांमध्ये मिळून २५ स्टॉल लावले. विक्री केंद्र पुण्यात असल्यामुळे अनेकांना भागातल्या उपक्रमात सहभागी होता येते.

१. कातकरी वस्तीवरील लोकांकडून जांभूळ खरेदी करून निवासातील युवतींच्या मदतीने पुण्यात विविध सोसायट्यांमध्ये विक्री केली. तसेच संपदा प्रकल्पातील महिलांनी पण जांभळे विक्रीसाठी दिली. यंदा ४०,०००/- रुपयांची जांभळे २ आठवड्यात विकली.

२. बृहन महाराष्ट्र कॉमर्स कॉलेजच्या प्रथम वर्षाच्या फिल्म बनवण्याच्या मुलांनी आपली उत्पादने सामाजिक जाणीव म्हणून कॉलेजमध्ये विक्री करण्याचा प्रकल्प केला. कॉलेजमध्ये लावलेल्या स्टॉलवर रु. ५०,०००/-ची विक्री झाली.

३. प्रबोधिनीमध्ये प्रज्ञा-मैत्र उपक्रम चालू आहे. त्यातील सहभागी मुलांची पालकांसोबत ६ नोव्हेंबरला संपदा प्रकल्पाच्या गावात सहल ठरवली होती. या गटातल्या १०० जणांनी प्रकल्पाच्या विविध गावांना भेट दिली. ग्रामीण जीवन अनुभवले! गटाने गावात बनलेल्या उत्पादनाच्या स्टॉलवरून भरपूर खरेदी केली. गावात नुकत्याच सुरु केलेल्या शेवया उत्पादन उद्योगाला मदत म्हणून २०० किलो शेवया खरेदी करून प्रोत्साहन दिले हे विशेष.

४. हाताने केलेले भरत काम चांगल्या दर्जाचे यंदा मोठ्ठ्या प्रमाणावर बनवले. अशा हाताने केलेल्य भरतकामाचे ट्रे ऑस्ट्रेलियालाही पाठवले.

**२) धनश्री प्रकल्प** : धनश्री प्रकल्पाअंतर्गत नसरापूर केंद्रांवर कौशल्य प्रशिक्षण वर्ग घेतले जातात. या वर्षी खालील वर्ग झाले :

▷ **पार्लर वर्ग** : ४ महिने कालावधीचा पार्लर वर्ग नसरापूर येथे घेण्यात आला. त्याला ८ गावातील १४ जणींनी प्रवेश घेऊन वर्ग पूर्ण केला. या प्रशिक्षणा नंतर वर्गातील ३ जणींनी आपापली पार्लर टाकली सुद्धा. स्वातीताई यांनी या वर्गाचे काम जबाबदारी घेऊन पार पाडले.

▷ **फॅशन डिझाईनिंग :** शिवण वर्गातला पुढील अभ्यासक्रम म्हणून फॅशन डिझाईनिंगचा वर्गही नसरापूर येथे झाला. १३ जणींनी हा वर्ग यशस्वीरीत्या पूर्ण केला.

▷ **शिवण वर्ग :** बारेखुर्द व नांद गावामध्ये सायबेज-खुशबू प्रकल्पातून शिवणवर्ग घेण्यात आला व प्रमाणपत्र वाटप करण्यात आले

**३) वाल्मिकी बचत गट :** आधुनिक चुलीसाठी लागणारी इंधनकांडी वाल्मिकी बचत गट तयार करतो. यंदा त्यांनी ५ टन ५०० किलो इंधनकांडीचे उत्पादन करून विकले. एक टन उत्पादन तयार झाल्यावर त्याला हिरवा झेंडा दाखवण्याचा छोटा कार्यक्रम केला ज्याला तालुक्याचे पुढारी अमोलदादा नलावडे, शोभाताई जाधव, प्राथमिक केंद्राचे डॉक्टर, पोलीस अधिकारी असे मान्यवर आले होते.

पुण्यात जैव इंधनावर परिषद होती, त्याला इंधन कांड्या निर्मिती करणाऱ्या वाल्मिकी गटाच्या प्रमुख सुरेखा दिघे व २ सदस्य सहभागी झाले होते. त्यानिमित्ताने बायो फ्यूएल सर्कलच्या लोकांचा परिचय झाला. आपल्या इंधन कांडी विक्रीसाठी ते मदत करणार आहेत. कंपनीच्या श्री. लवळेकरांनी आडवली गावाला भेट दिली.

**४) राम सीता पुराणिक तंत्र निकेतन, शिवापूर**

या वर्षात नेहमी प्रमाणे स्वयंरोजगार प्रशिक्षण व उत्पादन झाले. वर्षभरात केंद्रातून ७८,२९७/– रु. ची उत्पादने केली. शिवणकामा बरोबरच कौशल्य म्हणून मणीकाम, कागदाचे क्विलिंग हे कौशल्य शिकवले. अशा कौशल्यांचे २३ प्रशिक्षण वर्गात ११५ जणींचे प्रशिक्षण झाले. यंदाच्या प्रशिक्षणात एक नवी भर होती ती म्हणजे अनघाताई साबणे यांनी प्रशिक्षण दिल्यामुळे आपण भरतकाम केलेल्या गुढ्या विक्रीसाठी बनवल्या होत्या अशा १८० गुढ्यांची विक्री झाली. तसेच एका बँकेसाठी त्यांचा लोगो असणाऱ्या, हातानी केलेल्या भरतकामाच्या फ्रेम तयार करून दिल्या.

▷ **कला वर्ग :** तंत्रनिकेतनात लहान मुलींसाठी रविवारी भरतनाट्याचा वर्ग ८ महिने चालवला. ज्ञान प्रबोधिनी प्रशालेची माजी विद्यार्थिनी मानसी काळे ही प्रशिक्षण द्यायला येत होती. वर्गाला ७ मुली नियमित येत आहेत.

**५) हरित ऊर्जा शेती प्रकल्प :** शेतात नेपियर (हत्ती) गवताची लागवड करायची, १२० दिवसानंतर ते कापायचे, कापलेल्या गवताची पावडर करायची त्यापासून छोट्या पॅलेट करायच्या, ज्यांचा वापर इंधन म्हणून करता येईल. अशा प्रकल्पाची आडवली गावातील 'हरित ऊर्जा बचत गटाच्या' महिला सभासदांनी जबाबदारी घेतली. ग्लोबंट इंडिया प्रा. लि. या कंपनीच्या अर्थसहाय्यातून, गंगोत्रीच्या तांत्रिक मदतीने ज्ञान प्रबोधिनीने हा प्रकल्प सुरू केला. आडवली गावात मार्च अखेर पर्यंत १० एकर जमिनीवर नेपियर गवताची लागवड करून झाली व काही यंत्रांची खरेदी झाली. **ऊर्जा शेती** या अगदीच वेगळ्या प्रकल्पाला या निमित्ताने सुरुवात केली.

**६) संपदा प्रकल्प :** राजगडाच्या पायथ्याच्या, वेल्हे तालुक्यातील ९ गावांमधून २०२१ पासून सायबेज–आशा यांच्या आर्थिक मदतीने संपदा प्रकल्प चालू आहे. या वर्षात ९ गावातील महिलांसाठी १६७ स्वयंरोजगार कौशल्य प्रशिक्षणे योजली आणि ४७ ठिकाणी स्टॉल लावले, जिथे ५,००,०००/– रुपयांपेक्षा जास्त विक्री झाली. ग्रामीण महिलांचे उत्पादन वाढले पाहिजे यासाठी आपण भरीव काम केले. वर्ष अखेर सर्वेक्षणात असे लक्षात आले की आपल्या प्रयत्नामुळे २५ महिलांचे उत्पादन १०,०००/– ते २५,०००/– रुपयांनी वाढले. या प्रकल्पामुळे पिठाची गिरणी घेतलेल्या गटाने विविध पिठे उत्पादन करून पुण्यात पुरवण्याचा उद्योग करून साधारण २,००,०००/– रुपयांची उलाढाल केली.

▷ **अभ्यास सहली :** स्वयंरोजगारा विषयीची जाणीव वाढावी म्हणून १० अभ्यास सहलींची योजना केली होती. कच्चामाल कुठे मिळतो हे बघायला पुण्यात रविवार पेठेत सहल काढली तर तयार माल विकायची संधी कधी घ्यायची हे समजण्यासाठी विक्री केंद्रावर सहल काढली. त्याच बरोबर उत्पादन कारखान्यात कसे बनते हे बघायला आपल्या भागातील धांगवडी गावातील अन्नप्रक्रिया उद्योगाला भेट दिली, तिथे कोकम सरबत, आवळा सरबत, मसाले, फरसाण यांचे उत्पादन होते. उत्पादनाचे पॅकिंग, लेबलिंग बनवण्याची पद्धत ही सर्व पहिले. तसेच भागात असणाऱ्या कॅशोरीना रीसॉर्टला भेट दिली. भेटीनंतर ९ गावातल्या १२ जणी हाऊस कीपिंगचे काम तिथे करू लागल्या आहेत. हे स्वयंरोजगाराच्या दृष्टीने महत्त्वाचे असे एक पाउल पुढे टाकले गेले.

**७) उपयुक्त देणगी :** गावात महिला उत्पादन करतात पण केलेले उत्पादन विक्रीसाठी द्यायचे तर नीट वजन करून, प्लॅस्टिक पिशवीत घालून बंद करून द्यावे लागते. हे करण्यासाठी गावातल्या घरात छोटा वजन काटा नसतो आणि प्लॅस्टिकची पिशवी बंद करायला लागणारे विजेवर चालणारे यंत्र नसते, उत्पादन वाहून न्यायला मोठ्ठी पिशवी नसते अशा अडचणी लक्षात आल्या. बिवलकर आजींनी त्यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्ताने यासाठी देणगी दिली. त्यांच्या देणगीतून ४० गावातल्या ४० जणींना असे स्वयंरोजगार पूरक साहित्य त्यांच्या हस्ते वाटप केले.

**८) स्वयंरोजगारासाठी यंत्रे खरेदी :** अडोर कंपनीच्या आर्थिक मदतीने साखर गावातल्या एकल महिलांसाठी आणि कातकरी उपक्रमातील गटांनी स्वयंरोजगार करण्याकरता यंत्रे खरेदी केली. यात शिवण यंत्र व सोबत अन्न प्रक्रियेसाठी लागणारी काही यंत्रे, बांबू प्रक्रिया यंत्र अशा भांडवली वस्तू स्थानिक स्वयंरोजगार करू इच्छिणाऱ्यांना देण्यात आल्या. यामुळे काही जणींनी उत्पादनाला सुरुवात केली, त्यात मसाले, चटण्या तसेच विविध प्रकारच्या गोधड्या बनवण्याचे प्रशिक्षण सुरु केले.

## ◆ खेळते भांडवल ◆

चार पैसे स्वतःच्या संसाराला जोडता आले तर महिलांचे आयुष्य आज आहे त्यापेक्षा चांगले होऊ शकेल असा विचार करून ज्ञान प्रबोधिनी फौंडेशन अमेरिका यांनी छोट्या व्यवसायासाठी तात्पुरते खेळते भांडवल उपलब्ध करून दिले. या वर्षी बचत गटात असणाऱ्या ६ जणींना ३,४४,०००/– रुपये अर्थसहाय्य दिले, जे त्या टप्प्याटप्प्यात परत करतील. आजपर्यंत असे भांडवल ५६ जणींना दिले आहे.

## ◆ अर्थसखी प्रकल्प ◆

गावपातळीवरील महिलांनी अर्थव्यवहाराच्या मुख्य प्रवाहात यावे यासाठी त्यांची कागदपत्रे चोख असावी लागतात. पण ग्रामीण महिलांना त्यांची जाणीव नसल्यामुळे त्या अर्थव्यवहारात मागे पडतात. म्हणून बचत गटाचे पुढचे पाऊल म्हणून गाव पातळीवर तिला बँकेत खाते काढणे, आधार कार्ड वर आवश्यक असल्यास दुरुस्ती करणे, पॅन कार्ड काढणे यासाठी कृतिशील मदत करणारी अर्थ सखी मिळाली तर गावातल्या महिलांचा आत्मविश्वास वाढेल. ग्रामीण महिला अर्थसखींच्या

मदतीने आर्थिक घडामोडींच्या प्रवाहात प्रवेश करेल असा प्रकल्प आपण रोटरी क्लब ऑफ पुणे गांधीभवन यांच्या अर्थसहाय्याने केला. या प्रकल्पामध्ये आधार कार्ड काढणे, pan card काढणे, बँकेत खाते काढणे, आधार कार्ड बँक खात्याला जोडणे, सुकन्या समृद्धी योजनेत खाते काढणे, पंतप्रधान विमा योजनेत खाते काढणे (PMSBY, PMJJBY), एटीएम कार्ड काढणे, नवे ppf खाते काढणे, ई श्रम कार्ड काढणे अशी अनेक कामे केली. ८५ गावांमध्ये ३४ अर्थ सख्यांच्या मदतीने वरीलपैकी ३,०३८ कामे केली. या कामाच्या अनुभवावर Financial Literacy in Rural Women - case study of five villages from Haveli Taluka असा संशोधन निबंध लिहिला जो International Research Journal Of Multi disiplinary Studies या जरनलच्या सप्टेंबर २०२३च्या अंकात प्रकाशित झाला.

अर्थसखी हा प्रकल्प अगदीच वेगळा होता त्यात खूपच विविध प्रकारचे अनुभव आले काम करणाऱ्या अर्थसखीच्या अनुभवांचे लेखी संकलन दर गुरुवारी स्त्री शक्ती ग्रामीण या व्हॉट'स् अप गटावर सलग १६ गुरुवार केले.

# आरोग्य

**१) आरोग्य तपासणी –** तालुका पातळीवर आरोग्य विषयक काम २२–२३ या वर्षात आरोग्य तपासणी स्वरूपात झाले. तपासणीमध्ये काही विशेष उपचारांची गरज आहे असे आढळल्यास ते होण्यासाठीचे अनुधावन असे काम केले. तपासण्यांचा तपशील –

| क्र. | विषय | शिबिर संख्या | सहभागी | पाठपुरावा |
|---|---|---|---|---|
| १. | गरोदर माता तपासणी | ११ | ४३९ | २० डिलीव्हरी |
| २. | कॅन्सर पूर्व तपासणी | ४ | ४९ | ३ ऑपरशन |
| ३. | मोती बिंदु तपासणी | २ | ८४ | २ |
| ४. | दंत चिकीत्सास्ता | ३० | २६९ | – |
| ५. | बालआरोग्य तपासणी | १० | ३९२ | १४ मुले 2D टेस्ट |
| ६. | नवजात शिशुतपासणी | २ | ४४ | – |
| ७. | जेष्ठ नागरिक मदत | – | ९२ | ५ |

बाल आरोग्य तपासणीमध्ये काही मुलांची 2D ECO टेस्ट करण्याची गरज वाटली तशी यंदा नव्याने करण्याची व्यवस्था केली. तपासणी केलेल्या बालकांमध्ये कुपोषणाचे प्रमाण अगदी अल्प आढळले.

**२. कॅन्सर माहिती संकलन :** गेल्या वर्षी सुरु केलेले कॅन्सर माहिती संकलनाचे कामही यंदा चालू होते. यावर्षी गावामधून ४,००० फॉर्म भरून घेतले. गेल्या वर्षीचे धरून एकूण १०,००० फॉर्म भरण्याचे काम गावातील कार्यकर्त्यांनी पूर्ण केले. यांचा एक अहवाल कारकीनो कंपनीने दिला त्यात भविष्यात कॅन्सर होण्याची शक्यता ज्यांना जास्त आहे अशांपैकी तपासणी करण्याची गरज कोणाला आहे याविषयी माहिती दिली.

**३. बाल आरोग्य तपासणी विशेष :** बालरोग तज्ञ डॉ प्राजक्ता दोशी २०१९ पासून वेल्हे भागात बाल आरोग्य तपासणीसाठी येत आहेत. यावर्षी १० तपासण्या झाल्या. या तपासणी मध्ये वय वर्ष एक ते बारा या वयोगटातील मुलांची तपासणी झाली. मोठ्या मुलांच्या तपासणी बरोबरच नवजात बालकांची काळजी घेणारा सहा जणींचा एक गट डॉक्टरांनी मासिक प्रशिक्षण देऊन उभा केला. या गटाने नवजात शिशू तपासणीसाठी दरमहा गृहभेट देऊन बालकांचे एक वर्ष पूर्ण होईपर्यंत, बालकाचे वजन उंची दंडघेर व डोक्याचा घेर अशा ४ नोंदी ठेवण्याची जबाबदारी या सहा जणांनी घेतली. वर्षभरात अशा २५ नवजात बालकांच्या अशा मासिक नोंदी वर्षभरामध्ये साधारण अडीचशे गृहभेटी देऊन या गटाने केल्या. गृहभेटीमुळे माता पालिकांचे लसीकरणा संबंधित प्रशिक्षणही केले व बाल आरोग्य जागृतीही केली. या नवजात बालकांना वर्षभर विटामिन डी डॉक्टरांच्या सल्ल्याने दिले. नवजात शिशु आरोग्य ही यावर्षीच्या आरोग्या तपासणी मधली सगळ्यात महत्त्वाची भर होती.

**३. ज्वाला प्रकल्प :** दुर्गम गावांमध्ये चुलीसाठी लाकूड वापरले जाते. लाकडाच्या चुलीमुळे धूर होतो, धुराचा विपरीत परिणाम महिलांच्या फुफ्फुसावर व डोळ्यांवर होतो. याशिवाय झाडेही तोडली जातात, पर्यावरणाची हानी होते. या दोन्ही प्रश्नांवर उपाय म्हणून जैव इंधनावर चालणारी, पंखा असणारी आधुनिक चूल यंदाही आपण वाटप केली. या प्रकल्पाला 'ज्वाला प्रकल्प' नाव दिले. चुली सोबत वर्षभर पुरेल एव्हढे इंधनही दिले. हे काम वेगवेगळ्या गावांमध्ये वेगवेगळ्या कंपनी सोबत केले. बॉस्टन सायंटिफिक कंपनीच्या आर्थिक मदतीने ५० चुलींचे वाटप केले. चूल वाटप करायला कंपनीतील उच्च अधिकारी श्री. चारुदत्त आणि त्यांचे ६ सहकारी असे ७ जण मेट पिलावरे गावात आले होते. कोफोर्ज कंपनीच्या स्वाधार प्रकल्पाच्या मदतीने ५५ चुलींचे वाटप केले. या शिवाय ३० चुली वैयक्तिक देणगीदारांच्या मदतीने वाटल्या. या चुलींच्या वापरामुळे त्या कुटुंबातील महिलांच्या आरोग्यावर चांगला परिणाम झाला आणि काही टन लाकडाची तोड थांबली!

# समूहगुण विकसन

## ◆ किशोर-किशोरी विकास उपक्रम ◆

▷**विद्याव्रत संस्कार :** किशोरवयीन मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी लहानपणातच त्यांच्यावर काही संस्कार केले तर त्यांच्यात स्वतःचे व्यक्तिमत्त्व घडवण्याची/फुलवण्याची प्रेरणा जागृत होते. या वयातील मुलांना त्यांच्या क्षमता विकसित करण्यासाठी आपण ८ वी ते १० वी या वयोगटातील किशोरींसाठी गेली १५ वर्षे काम करतो आहोत. किशोरींसोबत काम करताना किशोरांसोबतही काम करण्याची गरज लक्षात घेऊन २०२२ पासून किशोरांसाठीही कामाला सुरुवात केली.

माहे ऑक्टो. २०२२ ते फेब्रु. २०२३ या कालावधीत कल्याण, कुसगाव, वर्वे, कुरुंगवडी अशा ४ शाळेत इ. ८वीतील १५५ मुला-मुलींसाठी व्यक्तिमत्त्व विकसनाची एकूण १० सत्रं झाली. या सत्रांमधून पंचकोष विकसनावर आधारित अन्नमय कोष, मनोमय कोष, प्राणमय कोष, विज्ञानमय कोष, आनंदमय कोष असे पाच कोष मुलांना समजावून सांगितले. वाढ व विकास या मधील फरक समजावून सांगितला. वाढीच्या वयात शारीरिक, मानसिक बदलांना सामोरे जाताना स्वतःला ओळखून स्वतःला स्वीकारणे व घडवणे म्हणजे काय या सगळ्याची माहिती मुलांना सत्रांमधून देण्यात आली. या ४ शाळेत सत्र घेण्यासाठी पुण्यातून श्रिया संस्थेतून ८ जणांचा गट दर शनिवारी शाळेत जात होता.

▷ **तंबूतील निवासी शिबिर :** दि. ७ व ८ जाने. २०२३ या दोन दिवशी साखर येथे मुला-मुलींचे तंबूतील निवासी शिबिर झाले. गटकार्य, विविध विषयांवर प्रसंगनाट्य सादरीकरण, हस्तकौशल्य, इकिगाई (आवड, छंद, गरज, ध्येय) अशा विषयावर मुला-मुलींची गटचर्चा घेण्यात आली. पद्य गायन, उपासना, खेळ घेण्यात आले. ४ शाळेतील एकूण ९६ मुलं-मुली या शिबिरात सहभागी होते.

मुलांच्या वाढीमध्ये, विकसनामधे पालकांचा अतिशय महत्त्वाचा सहभाग असल्याने मुलांच्या पालकांशी संवाद साधणे गरजेचे होते. मुलांच्या व्यक्तिमत्त्व विकसनासाठी शाळेत घेत असलेल्या सत्राविषयी पालकांशीही बोलणे गरजेचे होते. या हेतूने ११ गावातील ७५ मुलांच्या गृहभेटी घेण्यात आल्या. पालकांशी संवाद साधत मुलांच्या घडणीविषयी व विद्याव्रत संस्काराविषयी माहिती सांगितली.

प्रबोधिनीमध्ये अनेक वर्ष घेत असलेला विद्याव्रत हा शैक्षणिक संस्कार या चारही शाळेतील मुलांवर १० सत्रांनंतर करणार असल्याचे ठरवले होते. त्या संस्कार कार्यक्रमाची तयारी होण्यासाठी मुलांना विद्याव्रत संस्कार म्हणजे काय याची माहिती दिली. झालेल्या सत्रांची उजळणी, श्लोकांचा सराव करणे व विद्याव्रत संस्काराचे महत्त्व या विषयी माहिती दिली गेली. दि. **२५ फेब्रुवारी २०२३ या दिवशी ४ शाळेतील मिळून १३३ विद्यार्थ्यांचा विद्याव्रत संस्कार कार्यक्रम झाला.** कार्यक्रम वरवे गावातील शिवनेरी मंगल कार्यालयात झाला. या कार्यक्रमासाठी श्रिया संस्थेतील ३५ जण उपस्थित होते. आचार्य म्हणून माळेगावचे माऊली अनाथ आश्रमाचे प्रमुख तसेच कीर्तनकार ह. भ. प. नवनाथ महाराज लिम्हण हे आचार्य म्हणून उपस्थित होते.

## ◆ दल ◆

जुलै २०२२ ते मार्च २०२३ या कालावधीत वेल्हे तालुक्यातील पासली खोऱ्यात जाधववाडी, पासली, शेणवड, केळद, निगडे, गेळगाणी, नाळवट, वरोती, कोलंबी, कुसारपेठ या १० गावात तसेच वाजेघर खोऱ्यात सोंडे कार्ले, सोंडे सरपाले, वडगाव झांजे, सुरवड, कोदवडी, दामगुडा आसनी, मंजाई आसनी, भागिनघर, मार्गासनी, वीरवाडी, मालवली, आवळी या १२ गावात अशा एकूण २२ गावांमध्ये दल हा उपक्रम चालवला गेला. ६ ते १४ वयोगटातील २६५ मुला-मुलींसाठी गावपातळीवर नियमित दले घेण्यात आली.

दलावरील मुलांच्या शारीरिक क्षमता विकसित व्हाव्यात याकरिता दलांचे नियोजन करण्यात आले होते. तसेच याचबरोबर नवीन खेळ व नवनवीन विषयांची माहिती समजावी यासाठी वेगवेगळे उपक्रम घेऊन दलांच्या माध्यमातून विषय पोहचवण्यात आले. नियमित दलातून खेळ (बौद्धिक खेळ, मैदानी खेळ), व्यायाम (चेतना व्यायाम, सूर्यनमस्कार), खेळातून अभ्यास, हस्तकौशल्य असे विषय दलावर घेण्यात आले. नियमित दलासोबत वर्षभरात विशेष कार्यक्रमही घेण्यात आले.

१. **वनभोजन** – या निमित्ताने दलावरील मुलांची आपसात मैत्री वाढण्यास मदत होते. सहभागी ९८ मुलं-मुली
२. **पुरंदर किल्ला सहल** – नवीन गोष्टी शिकण्याचा/ पाहण्याचा आनंद घेता यावा, इतिहास समजून घ्यावा या हेतूने पुरंदर किल्ल्यावर सहल. सहभागी ७८
३. **गृहभेटी** – मुलांमधील कलाकौशल्य, क्षमता पालकांना सांगून त्यांचा दलावरील सहभाग कसा वाढवता येईल तसेच आपला मुलगा दलावर जातो म्हणजे कुठे जातो, काय करतो, याची माहिती पालकांना व्हावी यासाठी मुलांच्या गृहभेटी घेतल्या. ७५ मुलांच्या गृहभेटी
४. **शिवनेरी किल्ला सहल** – दल घेणाऱ्या ताया कामाव्यतिरिक्त एकत्र याव्यात, त्यांच्यामध्ये विचारांची देवाण घेवाण व्हावी. तसेच गटाने नवीन गोष्टी शिकण्याचा/ पाहण्याचा आनंद घेता यावा इ. ७ ताई सहभागी.

## ◆ युवती विकास ◆

▷ **कामाच्या अनुभवातून जीवन शिक्षण :** वेल्हे तालुक्यातील दुर्गम भागात राहणाऱ्या मुलींना शिकता यावे यासाठी आपण मुलींचे सहनिवास चालवतो आहोत. यामध्ये ज्या युवती निवासाला येतात अशा अनेक युवतींनी आजवर आपापले पदवी पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. सहनिवासात राहून शिकत असताना त्यांना वेगवेगळ्या उपक्रमात काम करण्याची संधी दिली जाते. त्याचे विद्यावेतन दिले जाते. या विद्यावेतनातून त्यांचा कॉलेजचा प्रवासखर्च उभा करण्याची संधी आपण त्यांना देतो. या कामाच्या अनुभवामुळे त्यांचे जे शिक्षण होते ते त्यांना पुढे आयुष्यातही उपयोगी पडते. कातकरी मुलांसाठी चालू असणाऱ्या कामात निवासातील युवती वर्ग प्रमुख म्हणून काम करतात. या अनुभवामुळे त्या जबाबदारी घ्यायला आणि निभावायला शिकतात.

▷**जास्वंद कौशल्य वर्ग :** दहावी–बारावी झालेल्या मुलींसाठी सुट्टीच्या काळात तसेच ज्यांचे शिक्षण मध्येच थांबले आहे किंवा ज्यांच्याजवळ वेळ आहे अशा युवतींसाठी वेगवेगळ्या प्रकारचे कौशल्य प्रशिक्षण वर्ग घेतो. यामध्ये यंदा विविध हस्त कौशल्य, मेंदी, रांगोळी, शिवण, ओरिगामी याचे प्रशिक्षण घेतले. या प्रशिक्षणात युवती 'नवीन गोष्ट असली तरी मला शिकली की जमेल' असे शिकतात! त्यातून त्यांचा आत्मविश्वास वाढतो. अशा प्रशिक्षणात गुंतल्यामुळे त्यांचे लग्नाचे वय देखील पुढे जाते. या वर्षी असे वर्ग निगडे खु. (१६ युवती) व शिवापूर (२० जणी) या गावात झाले. निगड्यातील युवती वेल्हे निवासात एक दिवस मुक्कामी आल्या. प्रतिभाताईंनी परिचय सत्र घेऊन गप्पांच्या माध्यमातून साहस या विषयावर चर्चा घडवून आणली आणि दुसऱ्या दिवशी तोरणा किल्ला पाहिला. शिवापूरच्या गटाला पुण्यातील उद्योजिका मानसीताई बिडकर यांनी भेट दिली. त्यांच्या मार्गदर्शनाने एलईडी ट्यूब बनवण्याचा वर्ग शिवापूरमध्ये घेतला. १०० रु फी देऊन १६ युवती आल्या होत्या. ३ जणींनी मानसीताई यांच्या पुण्यातल्या कारखान्यात कामाचा अनुभव काही दिवस घेतला.

▷**संगणक प्रशिक्षण** : गेल्या वर्षी मिबा कंपनीने संगणक दिले. त्याचा वापर करून यंदा युवतींसाठी प्रशिक्षण वर्ग योजले. २३ जणींनी या वर्गाला प्रवेश घेउन यशस्वीरीत्या पूर्ण केले.

▷**महाविद्यालयीन तासिका :** यंदा अशा तासिका खूप पाउस असल्यामुळे जरा उशीराच सुरु झाल्या पण कॉलेजनी सहकार्य केल्यामुळे एकदम गती आली. या तासिकांमुळे महाविद्यालयात मार्च महिन्यात २००–२५० युवक–युवतींसाठी नियमित तासिकांशिवाय प्रेरणादायी सत्रं योजता आली

अशा तासिकांना बसलेल्या काही युवती गाव पातळीवर 'दल' घ्यायला येतात तर कोणी 'विकास मित्र' बनून शैक्षणिक प्रकल्पात सहभागी होत आहेत, कोणी 'कौशल्य प्रशिक्षण करणारी ताई' म्हणून गावात जात आहेत कोणी 'कातकरी प्रकल्प' या मध्ये जबाबदारी घेऊन काम करत आहेत. प्रतिभाताईंनी हा गट घट्ट बांधला आहे.

**असे अनुभव घेऊन, स्वप्न मोठी झालेल्या, काम करणाऱ्या जबाबदार युवती जेव्हा लग्न होउन सासरी जातात तेव्हा मात्र कामातूनच काय पण संपर्क ठेवण्याच्या कक्षेतून सुद्धा एकदम गायब होतात....**

- **अनेकींचे तर शिक्षणही थांबते. चालू शिक्षण थांबू नये यासाठी प्रयत्न करायला हवेत असे लक्षात आले.**
- **नवीन नवरीच्या बाबतीत असे होणे हे सार्वत्रिक आहे असेही लक्षात आले. मग या प्रश्नाचा आपण अभ्यास केला, लग्न झालेल्या पण कागदोपत्री अस्तित्वात नसणाऱ्या किंवा अनेक वर्ष माहेरचेच नाव कागदोपत्री लावणाऱ्या सुनांना येणारे प्रश्न कळले.**
- **लग्न झाल्यावर बदल तर होणारच म्हणून लग्नानंतरच्या व्यावहारिक बदलांना कसं सामोरे जावे यासाठीची जाणीव जागृती करणारा नवी उमेद असा प्रकल्प या प्रश्नावर उत्तर म्हणून सुरु झाला!**
- **विशेष म्हणजे या उपक्रमात आपण युवकही सहभागी करून घेत आहोत.**

विंझर, आंबवणे आणि चेलाडी या तीन महाविद्यालयांमध्ये शिकणाऱ्या युवतींसाठी जाणीव जागृती तासिका घेतल्या. या तासांमध्ये उपयुक्त माहिती देउन युवतींचे विश्व विस्तारले जाईल असा प्रयत्न केला जातो. या वर्षी निर्भय कन्या योजना, स्त्री–पुरुष संपूरकता, महिला सुरक्षा, महिला

### ◈ वेळेत शिकवू या! ◈

लग्न होण्याआधी म्हणजे युवती असतानाच युवतींना काही शिकवले तर तिला आयुष्यभर उपयोगी पडते. या विचाराने, जाणत्या वयात आपण युवतींचा व्यक्तीमत्व विकास व्हावा या उद्देशाने महाविद्यालयात तासिका घेतो. या तासांना बसलेल्या काही युवती आपल्या बोलण्यातून प्रेरणा घेऊन आपल्या सोबत काम करायची संधी घेतात. अनेक वर्षांच्या कामामुळे पालकांना आपल्या बद्दल विश्वास असल्याने ही संधी सहज मिळते. वर्षभर प्रबोधिनीचे काम केलं की आजूबाजूच्या लोकांना 'तिच्यामध्ये झालेला विधायक बदल, वाढलेला आत्मविश्वास लक्षात यायला लागतो.'

सबलीकरण अशा विषयांवर तज्ज्ञ व्यक्तींनी महाविद्यालयामध्ये जाऊन सत्रे घेतली.

▷**यशस्वी विद्यार्थिनी :** वृत्त कालावधीत वेल्हे भागातील दोन युवतींनी महर्षी कर्वे इंस्टीट्यूट येथील फॅशन डिझायनिंग कोर्सला प्रवेश घेतला. या दोघींचा पहिल्या वर्षाचा उत्तम रिजल्ट लागला. स्वप्नाली चऱ्हाटे आणि ऋणाली पवार ७६ टक्के मार्क मिळवून उत्तीर्ण झाल्या आहेत.

▷**अनुभव विश्व विस्तारण्यासाठी कंपनीला भेट :** विविध प्रकारचे व्यावसायिक काम युवतींनी बघावे यासाठी २६ युवतींची अभ्यास भेट जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून पुण्यातील केडन्स कंपनीला योजली होती. कंपनीत कोणत्या प्रकारचे काम केले जाते, भविष्यात कोणते शिक्षण घेतले तर अशा प्रकारची रोजगार संधी उपलब्ध होऊ शकते याची माहिती घेतली. वेगवेगळ्या कंपन्यांमध्ये शहरातील युवती कशा काम करीत आहेत हे ग्रामीण युवतींनी पाहिले. केडन्स कंपनीच्या अधिकारी आश्लेषा करंदीकर यांनी या जगाची आत्मियतेने ओळख करून दिली.

▷**स्कॉलरशिप :** ग्रामीण युवतींच्या शिक्षणासाठी अनेकदा कुटुंबाच्या बजेटमध्ये पैसे नसतात. त्यामुळे युवतींचे महाविद्यालयीन शिक्षण पुरे होत नाही गेली अनेक वर्ष शिक्षणात चांगली गती असणाऱ्या युवतींना आपण स्कॉलरशिप देतो. निवासात राहणाऱ्या मुलींना कॉलेज पर्यंत जाण्याचा प्रवास खर्च सुद्धा स्कॉलरशिप म्हणून द्यावा लागतो. यंदा शिक्षणाच्या फी साठी म्हणून १८ गावातील २२ युवतींना मिळून आपण ४,४९,६६०/– एवढी स्कॉलरशिप दिली. मुख्यतः निगवेकर, सायगावकर, गोडसे, ज्ञान प्रबोधिनी फाउंडेशन यांच्या निधीमधून व काही वैयक्तिक देणगीतून ही रक्कम दिली.

### ◆ समूहगुण शिबिर ◆

विभाग सदस्यांचे वेल्हे येथे २ दिवसाचे मुक्कामी समूहगुण शिबिर झाले. २० गावातून २२ कार्यकर्त्या शिबिरात २ दिवस सहभागी झाल्या. पहिल्या दिवशी बागेश्रीताईंनी कार्यकर्त्यांची स्वयंप्रेरणा यावर महिलांना मार्गदर्शन केले. तर दुसऱ्या दिवशी अखिलेशदादाने सहकार्य वृत्तीवर सत्र घेतले.

**यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ परीक्षा :** यंदा १५ जणींनी मुक्त विद्यापीठाच्या अभ्यासक्रमाला प्रवेश घेतला. या प्रवेशा नंतर आज पर्यंतची प्रवेश संख्या १७५ झाली. यंदा तृप्तीताई व नवनाथदादा यांचे पदव्युत्तर शिक्षण पूर्ण झाले तर ३ जणींनी पदवी संपादन केली.

गांधर्व महाविद्यालयाच्या मदतीने आंबवणे, वेल्हे येथे संवादिनी वादनाचा वर्ग ६ महिने चालवला.

अश्विनीताई, भारतीताई व रंजीताताई यांनी योग प्रशिक्षक वर्ग पूर्ण केला.

## हिरकणी

▷**हिरकणी माता प्रशिक्षण :** ० ते ६ वयोगटातील बालकांच्या मातांचे प्रशिक्षण असे हिरकणी प्रकल्पाचे स्वरूप आहे. या प्रशिक्षणामध्ये मातांना आपल्या घरातील उपलब्ध साधनांमधून मुलांचा बौद्धिक विकास कसा करता येईल याचे प्रशिक्षण दिले जाते. कारक विकास, इंद्रिय विकास आणि शारीरिक–बौद्धिक विकास होताना 'आई' म्हणून कसे पूरक होता येते याचे प्रशिक्षण असते.

यंदा भोर तालुक्यातील जोगवडी भागातील १० गावातील साधारण १२५ जणींसाठी हिरकणीची नियमित सत्रं झाली.

गेल्या १० वर्षात मिळून या प्रशिक्षणात ९८६ माता सहभागी झाल्या. या प्रशिक्षणाचा उपयोग सहभागी मातांनी बालसंगोपनासाठी केल्याचे लक्षात आले. माता प्रशिक्षणाचा उपयोग मुलांच्या जडणघडणीत अत्यंत महत्त्वाचा असल्याने, त्याचा विस्तार होऊ शकतो असे जाणवले. यासाठी प्रशिक्षण घेणारा गट वेल्हे तालुक्यातील ९ गावातल्या १७ जणींचा गट तयार झाला आहे.

▷**विस्तार मेळावा :** दिनांक ७ जानेवारीला पुण्यात प्रबोधिनीच्या प्रबोध सभागृहात हिरकणी विस्तार मेळावा घेतला. या कार्यक्रमाला भोर, मुळशी व साताऱ्यातील कासपठार भागातील शासकीय अंगणवाडीच्या सुपरवायझर उपस्थित होत्या. प्रबोधिनीच्या साळुंब्रे, सोलापूर केंद्राचे प्रतिनिधी उपस्थित होते. ज्यांना आपल्या कामाच्या क्षेत्रात हिरकणी विस्तार करण्याची इच्छा आहे असे कोल्हापूर, सिंधुदुर्ग, चिपळूण सातारा येथील संस्थांचे सदस्यही उपस्थित होते. असे सगळे मिळून १० गावातील ११२ महिला प्रतिनिधी मेळाव्याला उपस्थित होत्या. मेळाव्यात प्रशिक्षणातील हिरकणी मातांचे अनुभव कथन झाले. त्यात प्रशिक्षित मातांची मुले वेगळी उठून कशी दिसतात हे जिल्हा परिषदेतील शिक्षकांनी सांगितले. काही मातांची मनोगते चित्रफीत रूपात दाखवली. शेवटी कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या उमाताई बापट यांनी गटाला मार्गदर्शन केले.

# वंचित विकास

## ◆ सहनिवास ◆

मुलींच्या शिक्षणासाठी वेल्हे येथे जास्वंद गिरीकन्या सहनिवास ही आपल्या कामातील गेल्या दशकातील महत्त्वाची भर आहे. आजवर ४५ गावातील ८७ जणींनी येथे राहून शिक्षण घेतले. दुर्गम भागातील मुलींनी केवळ दुर्गमतेच्या कारणाने शिक्षणापासून वंचित राहू नये यासाठी हे काम सुरु झाले. या सहनिवासात एका स्थानिक कार्यकर्तीसह तिघीजणी पूर्णवेळ राहात असून वृत्त काळात एकूण ३४ विद्यार्थिनी राहात होत्या. निवासात अभ्यास पूरक वातावरण असते त्यामुळे मुलींना 'शिकावेसे वाटते' हे आपल्या निवासाचे वैशिष्ट्य आहे. अभ्यासासोबतच गणेशोत्सवात बरची नृत्य, जानेवारीत सावित्री बाई फुले जयंती साजरी करणे, ५–७वी तील मुलीची सिंहगड सहल असेही कार्यक्रम झाले.

▷**शनिवार शाळा :** मुलींसाठी शाळेतर शिक्षणासाठी 'शनिवार शाळा' घेतली जाते. उत्तम इंग्रजी संभाषण, गणितातील गमती जमती, ''चला आपल्या भाभा अणुशक्ती केंद्राचे काम कसे चालते हे पाहूयात'' असे अनेक विषय असतात. या वर्षी उद्योजकता विकास विषय चर्चा करून ८वीच्या मुलींनी मेंगाई जत्रेत पाणीपुरीचा stall लावला होता, तर अधिक नवरात्रामध्ये मुलींनी २ नाटके व नाच बसवून इतरांपुढे सादर केले. यावर्षी अशी ४५ सत्रे झाली.

▷**संवादिनी प्रशिक्षण :** गांधर्व महाविद्यालयाच्या पदाधिकारी आणि आपल्या प्रबोधिनीच्या माजी विद्यार्थिनी मा. परिणीताताई मराठे यांनी सहनिवासातील विद्यार्थिनींना संवादिनी वादन शिकवले. यामुळे १२ जणींनी पहिली परीक्षा दिली व सर्व उत्तीर्ण झाल्या. गांधर्व महाविद्यालयाला ९० वर्षे पूर्ण झाल्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात मुलींनी सहभाग घेतला.

▷**विविध अनुभव देण्याची व्यवस्था :** सहनिवासातील मुली गणेशोत्सवात बरची नृत्य करणे, स्वतःची सर्व कामे गटागटात करायला शिकणे (स्वच्छता, पाणी भरणे, स्वयंपाकाला मदत करणे, भांडी घासणे), गावागावात जाऊन युवतींनी दल घेणे, कातकरी वस्तीतील कामात ताईला मदत करणे, अशा सर्व अंगानी त्यांचे शिक्षण चालू असते. यात योगासने, सूर्य नमस्कार, उपासना असे प्रशिक्षण असते.

◆**प्रज्ञा शोध परीक्षा :** राज्यस्तरीय प्रज्ञा शोध परीक्षा जिल्हा परिषद प्राथमिक शाळा वेल्हे येथे झाली. सहनिवासातील लक्ष्मी शेंडकर हिने १८०पैकी १७० गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला तर पल्लवी वेगरे हिने १५२ गुण पाडून उत्तम यश मिळवले.

या वर्षी प्रथमच परीक्षा कालावधीत १०वी–१२वी मुलींचा परीक्षा ताण घालवण्यासाठी रश्मिताई यांनी ध्यानाचा वर्ग घेतला.

**संगणक प्रशिक्षण वर्ग :** ६ जणींनी संगणक प्रशिक्षण वर्ग पूर्ण केला.

या सोबतच विशेष कार्यक्रमात दलाव्यतिरिक्त मुलांसाठी दर महिन्यात येणारे सण, जयंती, याविषयीची माहिती सांगून ते दलाच्या दिवशी साजरे केले. तसेच मुलांना गटाचा नेता म्हणून नेतृत्व करता यावे, जबाबदारी घेण्याचा अनुभव घेता यावा यासाठी एखाद्या दिवशी दलावर आज्ञा देणे, खेळ घेणे अशा संधी उपलब्ध करून दिल्या गेल्या.

दले गाव पातळीवर चालतात. दल घेण्याची जबाबदारी गावातीलच एखादी ताई घेते. दल कसे घ्यायचे? या महिन्यात दलाचा अभ्यासक्रम काय, हे सांगण्यासाठी मासिक प्रशिक्षणाच्या नियोजन व आढावा बैठकी घेतल्या जातात.

## ◆ कातकरी विकास प्रकल्प ◆

दि. २ नोव्हें. या दिवशी कातकरी विकास प्रकल्पात काम करणाऱ्या १९ जणींचा प्रशिक्षण वर्ग घेण्यात आला. पद्य, प्रस्तावना झाल्यावर सर्वांची ओळख करून घेण्यात आली. त्यानंतर पहिल्या सत्रात कामाची ओळख करून घेण्यात आली. कामासाठी सर्वांशी संवाद कसा साधतो तसेच संपर्क कसे ठेवतो हे जाणून घेण्यात आले. दुसऱ्या सत्रात विषय सोप्या पद्धतीने कसा घ्यायला हवा, यावर कृती सत्र घेतले.

▷ **मुलांचे शिबिर :** पहिली ते सातवीच्या ६५ कातकरी मुलांचे शिबिर २४ आणि २५ डिसेंबरला घेतले. शिबिराचे विषय स्वच्छता आणि शिक्षण असे होते. मोठ्या गटासाठी शिक्षणावर फिल्म दाखवून चर्चा घेतली, निसर्गातील गोष्टींचा वापर करून घर तयार करणे व ते घर सुंदर व स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी आपली आहे असे एकत्र करून सांगितले, स्वतःसाठी रुमाल तयार करणे, शारीरिक स्वच्छता, चित्रवाचन, परिसर स्वच्छता, टाकाऊ पासून टिकाऊ वस्तू तयार करणे, वेगवेगळ्या झाडांच्या पानांचे निरीक्षण करणे अशी सत्रे घेण्यात आली, तर लहान गटासाठी गोष्ट सांगून त्यावर चर्चा घेणे, अंकांची पुस्तिका तयार करणे, स्पर्शांचे खेळ, शारीरिक स्वच्छता, दल, नैसर्गिक गोष्टींचा वापर करून चित्र काढणे, गंमत खेळ, चित्रांमधील फरक ओळखणे अशा सत्रांचे नियोजन करण्यात आले होते. रसिकाताई यांनी शिबिरासाठी मार्गदर्शन केले.

▷ **साताऱ्यातील श्रमजीवी संस्थेस भेट :** २१ मार्च रोजी कातकरी वस्तीवरील २४ जण आणि ६ युवती विभागातील कार्यकर्त्या अशा ३० जणांनी खैरे वलंग येथे श्रमजीवी संस्थेला

अभ्यास सहल योजली होती. कातकरी समाजासाठी काम करणाऱ्या श्रमजीवी संस्थेच्या वतीने वेगवेगळ्या व्यावसायिकांच्या सोसायट्या, पतसंस्था, मत्स्यबीज उत्पादन केंद्र याबद्दल संस्थेचे कार्यकर्ते विठ्ठल कोळेकर यांनी काम समजावून सांगितले. मनात आणले तर कातकरी समाजातील लोक सध्या रहात आहेत त्यापेक्षा चांगले जीवन जगू शकतात, पैसा प्रतिष्ठा मिळवू शकतात असे स्वतःच्या अनुभवातून त्यांनी सांगितले. मत्स्यबीज तयार करणारी तळी पाहिली. पोलादपूर येथील बोरज वस्तीतील काम प्रत्यक्ष पाहिले.

▷ **रोटरी क्लब ऑफ पुणे साउथ :** एका किटमध्ये एक निर्धूर चूल, सतरंजी आणि काही जीवनावश्यक वस्तू होत्या. असे ११ किट क्लबतर्फे भोसले पाली गावातील कातकरी वस्तीसाठी दिले.

▷ **सकस आहार :** फेब्रुवारी २०२३ पासून ५० मुलांसाठी १०० दिवसांचा सकस आहार हा उपक्रम सुरू केला. या उपक्रमाला ताडेकाम फाउंडेशनच्या आर्थिक मदत केली. फाउंडेशनच्या मृदुला केळकर यांच्या सह कार्यकर्ता गट मुलांच्या आरोग्य तपासणीच्या दिवशी स्वतः उपस्थित होता.

### ◆ एकल महिला ◆

गेली ८ वर्षे एकल महिलांचे काम वेल्हे तालुक्यात करीत आहोत. विविध सरकारी योजना त्यांच्यापर्यंत पोहोचवणे आणि त्याचा लाभ त्यांना मिळावा यासाठी नियमित काम चालू आहे. आज पर्यंतच्या आपल्या प्रयत्नांमुळे ९० महिलांना सरकारी योजनांचा लाभ मिळत आहे. त्या लाभाची आर्थिक बेरीज साधारण ६४ लाख रुपये आहे.

▷ **फराळ वाटप :** दिवाळीमध्ये २६ एकल महिला कुटुंबांना दिवाळी फराळ वाटप करण्यात आला.

▷ **विधान भवन बैठकीस उपस्थिती :** विधान परिषदेच्या अध्यक्षा मा. निलमताई गोऱ्हे यांच्या निमंत्रणावरून ज्या संस्था एकल महिलांसाठी काम करतात त्या सगळ्यांची बैठक विधान भवनात २७ मे रोजी आयोजित केली होती. त्या बैठकीला आशाताई सुर्वे आणि कुंदाताई खंडाळकर उपस्थित होत्या. सरकारच्या योजनेमध्ये लाभार्थी होण्यासाठी 'पात्र' असेल तर त्या महिलेचे ती 'कुटुंब प्रमुख असलेले रेशनकार्ड' लागते. बऱ्याच वेळेला एकल महिलेचे नाव सासरच्या किंवा माहेरच्या रेशनकार्डात असल्यामुळे तिच्यापर्यंत योजना पोहोचत नाही. ही अडचण मांडणारे पत्र निलमताई यांना दिले. एकल झाल्यानंतर महिलेला कमीत कमी वेळात (त्वरित) स्वतंत्र रेशनकार्ड तिच्या नावाने मिळावे अशी सूचना त्यात सुचवली आहे

▷ **गोष्ट एकल महिलांची :** एकल महिलांना येणाऱ्या अडचणी सगळ्यांना माहिती व्हाव्यात म्हणून वर्षभर एकल महिलांच्या केस स्टडी घेतल्या. त्यातल्या २५ निवडक केस स्टडी असणारे ''गोष्ट एकल महिलांची'' या पुस्तकाचे प्रकाशन सविता भागवत यांच्या हस्ते पुण्यात ज्ञान प्रबोधिनीच्या संचालकांच्या उपस्थितीत झाले. पुस्तक सध्या अंतर्गत वितरणासाठी उपलब्ध आहे.

▷ **आकाशवाणीवर प्रतिनिधित्व :** ज्ञान प्रबोधिनी करीत असणाऱ्या एकल महिलांसाठीच्या कामाची दाखल घेऊन, 'विधवा सन्मान' या कार्यक्रमात पुणे आकाशवाणीवर मुलाखत घेतली तर मुंबई आकाशवाणीवर मनोगत मांडायची संधी सुवर्णा गोखले यांना मिळाली.

### ◆ बालवाडी ◆

वेल्ह्यातील दुर्गम भागात कमी लोकसंखेच्या वस्तीवर २२-२३ या शैक्षणिक वर्षात संस्थेच्या वतीने ६५ मुलांसाठी ६ बालवाड्या चालवल्या. त्यापैकी २ बालवाड्या शासनमान्य होण्यासाठी गेली २ वर्ष प्रयत्न करत होतो, यंदा त्या शासनमान्य झाल्या. केवळ आपल्या या उपक्रमामुळे अनेक लहान मुलांना शिक्षणाची गोडी लागायला मदत झाली.

## नेतृत्व

### ◆ नवदिशा नेतृत्व प्रकल्प ◆

वेल्हे तालुक्यातील २५ गावांमधील २५ प्रतिनिधींसाठी नवदिशा नेतृत्व प्रकल्प चालू आहे. प्रकल्पाचा भाग म्हणून प्रशिक्षणासाठी प्रतिनिधींचे महिन्यातून एकदा एकत्रीकरण केले जाते. त्यामध्ये महिन्याच्या कामाचे नियोजन केले जाते. त्यात गावातील महिलांना एकत्र करून महिलांचे प्रश्न समजून घेण्यासाठी चर्चा केली जाते.

प्रकल्प प्रशिक्षणात ठरल्याप्रमाणे गाव प्रतिनिधींनी पुढाकार घेतला, २३ गावात नवरात्र मेळावे झाले, ५ गावात महिला ग्रामसभा झाल्या. आर्थिक साक्षरता प्रशिक्षण झाले त्यामध्ये कुटुंबाचे बजेट काढणे, स्वयंरोजगार कौशल्य प्रशिक्षण घेतले. प्रतिनिधींनी गावात पुढे करवंद व आंबा लोणचे याचे प्रशिक्षण घेतले.

दृष्टी विस्तारावी याकरिता नवदिशा प्रकल्पातील गाव प्रतिनिधींची निवासी सहल आंबेजोगाई येथे काढली. मग त्या प्रतिनिधींनी गावपातळीवरील महिलांच्या सहली काढून त्यांना देवदर्शना बरोबरच विविध ठिकाणी चालू असलेले सामाजिक, आर्थिक, उद्योगांचे प्रकल्प दाखवले.

नवदिशा प्रकल्पातील महिलांनी ''काश्मीर फाईल्स'' हा चित्रपट पहिला आणि तत्कालीन परिस्थिती जाणून घेतली.

# अन्य प्रकल्प

## ◆ नवी उमेद प्रकल्प ◆

आपल्या कामाच्या अनुभवामुळे एक वेगळीच संधी यंदा घेतली. लग्न झाल्यानंतर महिलेचे नाव बदलले जाते एवढेच काय पण पत्ता आणि बाकी गोष्टीही बदलल्या जातात. पण ग्रामीण भागात असे बदल कागदोपत्री आवर्जून केले जात नाहीत. स्वतःच्या अस्तित्वाचे पुरावे नसल्यामुळे अनेक जणी शासकीय योजनांपासून वंचित रहातात. यावर उपाय म्हणून अशा कागदपत्राबाबतची जाणीव जागृती करण्यासाठी नवी उमेद असा प्रकल्प योजला. अमेरिकास्थित मधुमतीताई व त्यांची कन्या नेहा यांनी प्रकल्पाला अर्थसाहाय्य दिले. या प्रकल्पाद्वारे १५ गावातल्या २०० महिलांपर्यंत कार्यकर्त्या पोहोचल्या आणि त्यांना या विषयीची माहिती दिली. त्यामुळे अनेकींनी मॅरेज सर्टिफिकिट काढले तर कोणी आधार कार्डवरचा मोबाईल क्रमांक अपडेट केला, रेशन कार्डवर नाव लावण्याची माहिती घेतली तर कोणाला बँक पासबुक वरचे नाव बदलण्यासाठी प्रयत्न करायला हवेत असे लक्षात आले. नवी उमेद हे हिरकणी वयोगटातील महिलांसाठी हिरकणी कार्यकर्त्यांनी केलेले एक अभिनव काम ठरले. ग्रामीण महिलांनी समाजाच्या मुख्य प्रवाहात येण्यासाठी आता येती काही वर्षे या विषयावर काम करण्याची गरज आहे असे या प्रायोगिक प्रकल्पामुळे नक्की झाले.

## ◆ स्वाधार प्रकल्प ◆

ज्ञान प्रबोधिनी व छाया संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आणि कोफोर्ज कंपनीच्या आर्थिक साहाय्यातून वेल्हे तालुक्यातील १८ गाव मावळ भागातील ५ गावांसाठी स्वाधार प्रकल्प चालू आहे. यात शेतकऱ्यांनी एकत्र येऊन शेतीला पूरक काही प्रशिक्षणे आणि छोटे उद्योग करावेत, सौर ऊर्जेचा चा वापर, गांडूळखत निर्मिती आणि वापर, शेळी /कोंबडी पालन अशा विविध तंत्रांचा वापर करून जीवनमान सुधारावे यासाठी हा प्रकल्प आहे. यात पुढील कामे झाली —

▷**पर्यावरण पूरक आधुनिक चूल वाटप :** महिलांचे कष्ट कमी व्हावेत, आंघोळीचे पाणी लवकर तापावे आणि जंगलाची होणारी बेसुमार जंगलतोड रोखावी म्हणून ५५ घरांसाठी पर्यावरण पूरक आधुनिक चुली वापरायच्या कशा हे दाखवून वाटप केल्या.

▷**बाल आरोग्य तपासणी :** ४ गावांमधील ० ते १२ या वयोगटातील ६५ मुलांची तपासणी दीनानाथ रुग्णालयातील बाल आरोग्य तज्ञ डॉ. प्राजक्ता दोशी यांनी केली. विशेष म्हणजे एकही मूल कुपोषित नाही.

▷**महिला मेळावा :** १७ गावांमधून महिला आणि दलांवरील मुले असे २६५ जण मेळाव्याला उपस्थित होते. मेळाव्यात दलांवरील मुलांनी लेझिम, नृत्य, गायन, सादर करून सहभाग घेतला. महिलांना चुलीचे प्रात्यक्षिक दाखवले, त्याविषयीचे फायदे सांगितले. स्वतः स्वयंरोजगार करून कुटुंब चालवणाऱ्या २ महिलांनी त्यांचे अनुभव कथन केले.

▷**गाववार बैठक :** स्थानिक रोजगार, माती परीक्षण, आणि शेती सहल या महत्त्वाच्या विषयांवर लोकांसोबत चर्चा घडून यावी, यासाठी गाववार बैठकी घेण्यात आल्या. बैठकीच्या निमित्ताने गावातील लोकांच्या गरजा आणि संधी लक्षात आल्या. करवंदाचा जाम बनवण्याचे प्रशिक्षण, माती परीक्षण, शेत सहली हे विषय चर्चेतून पुढे आले.

▷**गांडूळखत बेड बसविणे :** मातीचा दर्जा सुधारावा, रासायनिक खतांचा वापर करण्या ऐवजी सेंद्रिय खताचा वापर करून शेती करावी हे लोकांना कळावे यासाठी ४ गावांमध्ये गांडूळखत बनवण्याचे प्रशिक्षण देण्यात आले व ६ बेड बसवण्यात आले. बेड बसवल्या नंतर ३ महिन्यांनी गेळगाणी व कुसारपेठ येथून ३५० किलो गांडूळ खताची विक्री झाली.

▷**माती परीक्षण :** दुबार पिकाची शक्यता आहे का हे तपासण्यासाठी ३० शेतकऱ्यांच्या शेतीतील मातीचे नमुने गोळा करून परीक्षणासाठी देण्यात आले आहेत.

▷**खाद्य पदार्थ प्रशिक्षण :** महिलांना स्थानिक रोजगार उपलब्ध व्हावा याकरिता गेळगाणी, नाळवट, कोलंबी, वरोती या गावांमध्ये वरई लाहया, वरई लाडू, कैरी लोणचे, करवंद जाम, वडापाव, कांदा भजी, चिवडा, शंकरपाळी अशा खाद्य पदार्थांचे प्रशिक्षण घेतले. या प्रशिक्षणानंतर गेळगाणी येथे वडापाव व भजी, चहा विक्रीची टपरी सुरू करण्यात आली. तसेच दिवाळी निमित्ताने महिलांनी चिवडा व शंकरपाळी तयार करून विक्री केली.

▷**दल :** प्रकल्पातील प्रत्येक गावात दल घेण्यात आले. दलावर १ ली ते ७ वी वयोगटातील मुले-मुली गावापातळीवर आठवड्यातून २ दिवस २ तास एकत्र येऊन मैदानी खेळ खेळत होती.

▷**सहल :** दलांवर नियमित येणाऱ्या २२ मुलांची पुण्यात सहल नेण्यात आली होती. पेशवे उद्यान, ज्ञान प्रबोधिनी प्रशाला, लक्ष्मी नारायण मंदिर पाहिले. सहलीमध्ये मुले-मुली दोनही गटांचा चांगला सहभाग होता. प्रश्न विचारात होते, पुण्यात पहिल्यांदाच आलेली काही मुले असल्याने गाडीतून दिसणाऱ्या गोष्टींचे निरीक्षण करत, माहिती जाणून घेत होते.

▷**साहित्य वाटप :** ग्रामीण भागातील लेझिम, विटीदांडू, लगोरी यांसारखे पारंपरिक खेळ हळूहळू लुप्त पावत आहेत.

दोन वर्षांपूर्वी ज्ञान प्रबोधिनी फाउंडेशन न्यासाची स्थापना अमेरिकेमध्ये झाली. वृत्त कालावधीमध्ये या फाउंडेशनने आरोग्य सखी, एकल महिला, स्कॉलरशिप, नवदिशा नेतृत्व प्रकल्प, कौशल्य विकास अशा वेगवेगळ्या प्रकल्पांना भरीव आर्थिक मदत केली. त्यामुळे काम अतिशय जोरदार झाले. फाउंडेशनच्या काही पदाधिकाऱ्यांनी पुण्यात आले असताना या कामाला प्रत्यक्ष भेट दिली याचाही विशेष आनंद आहे. ग्रामीण महिलांनी केलेल्या उत्पादनाची विक्री अमेरिकेमध्ये करण्यासाठी सुद्धा एकत्र प्रयत्न करण्यात आले. मार्च महिन्यामध्ये महिला महिन्या निमित्ताने ग्रामीण महिलांच्या कामाला फाउंडेशनने मोठे निधी संकलन केले ज्याचा उपयोग २३-२४ या कालावधीसाठी सुद्धा होणार आहे. फाउंडेशन सोबतच्या कामानिमित्त अतिशय दूर राहणाऱ्या व्यक्तींपर्यंत आपले काम कसे पोहोचवायचे याचा विचार झाला आणि त्या निमित्ताने 'आँखो देखा' असे वाटण्यासाठी अनेक छोट्या क्लिप्स तयार झाल्या अशी वेगळीच संधी मिळाली.

तेच खेळ दलावरील मुलांना समजावे आणि ते खेळ दलावर मुलांनी खेळले जावे यासाठी दलावरील मुलांना लेझिम, ढोल, लगोरी यांसारख्या खेळाच्या साहित्याचे दलावर वाटप करण्यात आले. मुलांनी गावातील लोकांच्या समोर लेझिम सादर केल्यामुळे मुलांकडे व दल घेणाऱ्या ताईंकडे लोकांचा पाहण्याचा दृष्टीकोन बदलत आहे असे वाटते.

▷**वजन काटा वाटप :** कोलंबी, नाळवट, गेळगाणी या तीनही गावातील ग्रामपंचायतीमध्ये काही जबाबदारी घेऊन काम करत असलेल्या तसेच सरपंचांनी सुचवलेला व्यक्तीकडे वजनकाटा ठेवला आहे. धान्य मोजण्यासाठी याचा उपयोग होईल.

▷**शेत सहल :** कोलंबी, नाळवट, गेळगाणी, वरोती, जाधववाडी, पासली, माजगाव अशा सात गावातील मिळून १७ जणांची दापोली कृषी विद्यापीठ येथे शेत सहल नेण्यात आली होती. सर्वांचा सहभाग चांगला होता. वेगवेगळ्या प्रशिक्षणाबद्दल माहिती जाणून घेतली. तसेच कलम कसे केले जाते हे समजून घेतले.

▷**स्वयंरोजगारासाठी टपरी बसविणे :** गेळगाणी गावातील महिला व पुरुष यांना खाद्य पदार्थ प्रशिक्षण देण्यात आले होते. त्यावेळी गावातील लोकांसोबत स्थानिक रोजगार संदर्भात चर्चा करत असताना लोकांना मढेघाटासाठीचे वाढते पर्यटक लक्षात घेता, आपण गेळगाणी फाट्यावर खाद्यपदार्थांचा स्टॉल सुरू करू शकतो असा विचार पुढे आला. गावातील २ महिला व २ पुरुष खाद्यपदार्थांचा स्टॉल लावण्यासाठी तयार झाले. आठवड्यातील दोन दिवस शनिवार आणि रविवार असे दोन दिवस टपरी चालू असते. टपरीमुळे गावातील ३ लोकांना स्थानिक रोजगार मिळाला आहे.

⟐◈⟐

## ◈ पर्यावरण वारी ◈

जागतिक महिला दिनानिमित्त ११मार्च २०२३ रोजी दापोडे ते वेल्हे पर्यावरण वारी काढण्यात आली. वारीची तयारी १० दिवस २०-२५ कार्यकर्त्या करत होत्या. सगळ्यात लहान वय ६ वर्ष ते ७२ वर्षांच्या आजी पर्यंतचा गट सहभागी होता. **वारीमध्ये ६६ गावाचे प्रतिनिधित्व होते**. त्यात ५५० महिला, १५० मुलं-मुली व ५० पुरुष! **एकूण ७५० जण उपस्थित होते.**

बीज संकलन, भागातील वनस्पतींच्या संकलित केलेल्या माहितीचे बॅनर करुन लावले होते. त्या शिवाय लहान मुलांची पर्यावरणावर पथनाट्ये, गाणी झाली. पर्यावरण पूरक जगणाऱ्या मा. पौर्णिमा कुलकर्णींचे मार्गदर्शन आणि पर्यावरण अभ्यासक अमृताताईचे मार्गदर्शन झाले. कृषी अधिकारी यांनी हजेरी लावून ''मिलेट वर्षाची'' माहिती दिली. स्वाधार या प्रकल्पाच्या १८ गाव मावळ या प्रकल्पाच्या यू ट्यूब चॅनलचे प्रकाशन कोफोर्ज च्या दिप्तीताई यांच्या हस्ते झाले. कोफोर्ज कंपनीतून ५ जण वारीला आले होते.

वारीमध्ये हरित ऊर्जा शेती प्रकल्पातल्या महिला नेपियर गवत घेऊनच सहभागी झाल्या होत्या तर घिसरचा गट पानाफुलांनी नटून करवंदाच्या माळा घालून आला होता. कातकरी आणि मावळातल्या महिला गाण्यात रमून गेल्या होत्या. नवनगर विद्यालय, निगडीच्या १२ विद्यार्थिनी प्रतिनिधी सुद्धा वारीत सहभाग घ्यायला आल्या होत्या, हे विशेष!

# स्फुट

## ◆ पाहुणे भेटी ◆

**१. परदेशी विद्यार्थी :**

अ. जूनमध्ये सिम्बायोसिसमधून परदेशी विद्यार्थ्यांचा गट आपलं काम बघायला वेल्ह्यात आला होता. त्यावेळी त्यांनी आपलं बचत गटाचं उद्योजकतेचं काम बघितले. पॅलेट उत्पादन व पारंपरिक खेळ (६जणी) सुरेखाताईंकडे बघितले. स्वयंरोजगार स्टॉल लावला होता. ४२०० विक्री झाली. त्या शिवाय पाबे येथील पखवाज उत्पादन बघितले.

आ. स्टडी अब्रोड या संस्थेचा असाच एक विद्यार्थी गट जानेवारी २०२३ मध्ये येऊन आपले काम बघून गेला.

२. किर्लोस्कर फाउंडेशनच्या ट्रस्टी आरती किर्लोस्कर या वाजेघर भागातील महिला बचत गट सदस्य, हिरकणी कार्यकर्ता गट, यांना भेटल्या. त्यांनी वेल्हे निवासालाही भेट दिली, पॅलेट उत्पादन पाहिले.

३. लायन्स क्लबचे अध्यक्ष श्री. व सौ. देशपांडे यांनी वेल्हे निवासाला व त्या निमित्ताने आपल्या कामाला भेट दिली.

४. ले. जनरल मा. सुदर्शन हसबनीस (रि.) यांनी कुटुंबासह वेल्हे निवासाला व त्या निमित्ताने आपल्या कामाला भेट दिली.

५. नीलाताई देशपांडे यांच्या गोमेवाडी मधल्या स्त्री शक्ती गटाची निधान सांगवी व वेल्हे येथे भेट झाली. आपल्या महिलांचे अनुभव त्या गटाला खूपच उपयोगी पडले.

६. ज्ञान प्रबोधिनी प्रशालेतील ९वीतील ७ मुली यांनी स्त्री शक्ती प्रबोधन ग्रामीण भागाचा अभ्यास करायचा ठरवला म्हणून त्यांनी ३ क्षेत्र भेटी दिल्या तर ८ वी इयत्तेतील मुले व मुली यांच्या स्वतंत्र २ अभ्यास सहली शेती काम, ग्रामीण स्वयंरोजगार असे अभ्यासायला आडवली गावात येऊन गेले.

७. स्वेटरसाठी देणगी आवाहन केले, त्यास प्रतिसाद म्हणून १८,०००/- देणगी गोळा झाली. त्या रकमेचे शालीमार दुकानातून स्वेटर खरेदी करून दलावरील मुलांना वाटप केले.

८. रोटरी क्लब ऑफ पुणे डेक्कन यांच्या वतीने सुवर्णा गोखले यांना एक्सलन्स अवॉर्ड देऊन सन्मानित करण्यात आले.

## ◆ लेखन ◆

१. आपल्या अर्थसखीच्या कामाचा अनुभव कथन करणारा लेख लोकसत्ताच्या चतुरंग पुरवणीत आर्थिक साक्षरता सप्ताहा निमित्त छापून आला.

२. ॲग्रोवन दैनिकात आर्थिक साक्षरतेवर १० लेखांची मालिका छापून आली.

३. कातकरी गटासाठी काम करणाऱ्या आपल्या वेल्हे निवासी कार्यकर्त्या प्रतिभा स्वामी या कार्यकर्तीवर बागेश्री पोंक्षे यांनी साप्ताहिक विवेकमध्ये लेख लिहिला.

४. सखी या दूरदर्शन कार्यक्रमासाठी आपल्या कामाची माहिती देणारी सुवर्णा गोखले यांची मुलाखत प्रसारित झाली.

## ◆ प्रसार माध्यमातील हजेरी ◆

१. ८ मार्च जागतिक महिला दिनाच्या मुहूर्तावर ज्ञान प्रबोधिनी स्त्री शक्ती प्रबोधन ची वेब साइट सुरू केली.

२. Awakening of Rural Women Power : स्त्री शक्ती प्रबोधन या आपल्या चॅनलवर यंदा कामासंबंधी १३ फिल्म अपलोड केल्या.

या वर्षी आपण आपल्या कामाच्या काही छोट्या चित्रफिती केल्या. त्या आपल्या यू ट्यूब चॅनल वर आपल्याला बघायला मिळतील जरूर बघा.

- स्कॉलरशिप ग्रामीण युवतींच्या शिक्षणासाठी अनेकदा कुटुंबाच्या बजेटमध्ये पैसे नसतात त्यामुळे युवतींचे महाविद्यालयीन शिक्षण पुरे होत नाही गेली अनेक वर्ष शिक्षणात चांगली गती असणाऱ्या युवतींना आपण स्कॉलरशिप देतो निवासात राहणाऱ्या मुलींना कॉलेज पर्यंत जाण्याचा प्रवास खर्च सुद्धा स्कॉलरशिप म्हणून द्यावा लागतो यंदा शिक्षणाच्या फी साठी म्हणून १८ गावातील २२ युवतींना मिळून आपण ४,४९,६६०/- एवढी स्कॉलरशिप दिली.
- मुख्यतः निगवेकर, सायगावकर, गोडसे, ज्ञान प्रबोधिनी फाउंडेशन यांच्या निधीमधून व काही वैयक्तिक देणगीतून ही रक्कम दिली.

# विशेष लेख

## *कच्छ अर्थात गुजरात अभ्यास दौरा*

भारती खासबागे

संपदा प्रकल्पामध्ये ग्रामीण महिलांनी घरच्याघरी उद्योग सुरू करावेत म्हणून आम्ही गेले वर्षभर खूप प्रयत्न करत होतो. महिलांची मानसिकता बदलल्या शिवाय त्यांच्या दृष्टीकोनात बदल झाल्या शिवाय ते घडणार नाही असे लक्षात आले, म्हणून संपदा प्रकल्पातील गावांमधल्या २७ जणींचा १९ ते २३ डिसेंबर २०२२ या कालावधीत एक अभ्यास दौरा ठरवला.

दौऱ्यात सहभागी झालेल्या, गावात राहाणाऱ्या बहुतेक जणी आयुष्यात प्रथमच दुसऱ्या राज्यात निघाल्या होत्या. पुण्याहून कल्याण मार्गे कच्छला पोचलो. तिथे आम्ही खूप फिरलो. लोकं जरी तिथे वाळवंट बघायला येत असले, कच्छ उत्सव बघायला येत असले तरी आम्ही मात्र तिथल्या महिला फार शिकल्या नसल्या तरी कसे उद्योग करतात ते बघायला गेलो होतो. तिथल्या संस्था ग्रामीण भागात कसे काम करतात, ते बघायला गेलो होतो.

आम्ही आमचा मुकाम कच्छमध्ये रामकृष्ण मठात केला होता. दौऱ्याची सुरुवात तिथली ४५० गाई असणारी गोशाळा बघून केली. तेथे गाईच्या शेणाने तयार केलेल्या वस्तू बघितल्या. शेणापासून पणत्या, पूजेचे ताट, घड्याळ, तोरण असे काय काय बघितले. सगळ्या वस्तू खूप छान वाटत होत्या. वाटतच नव्हते की त्या शेणापासून तयार केलेल्या आहेत. आपल्याकडेही हे सगळे असून आपण त्याचा उपयोग करत नाही, याची महिलांना पहिल्यांदा जाणीव झाली.

खमीर संस्थेमध्ये गेलो. तेथे प्लॅस्टिकच्या पिशव्यांपासून धागा तयार करून त्याचे कापड तयार करतात ते पाहिले. त्या कापडापासून पुढे मोठ्या साईड बॅग तयार कशा करतात हेही पाहिले.

पुढची भेट अजरकपुर या गावाला दिली. तेथे बनत असणाऱ्या बांधणीच्या साड्या, ड्रेस मटेरियल पाहिले. तेथील घरे आपल्या भागापेक्षा खूपच मोठी आणि छान होती. प्रत्येक घराला उंच भिंतीचे कुंपण होते. आत काय आहे याचा अंदाज सुद्धा बाहेरून येत नव्हता. घरातच बाहेरच्या खोलीत दुकाने होती ती सगळी दुकाने महिलाच बघत होत्या पण त्या घराबाहेर पडत नव्हत्या. अशा घरात बसणाऱ्या महिलांचे गृह उद्योग पाहून आम्हाला खूप आश्चर्य वाटले तर त्यांना आमचा फक्त महिला–महिलांचा गट बघून आम्ही एवढ्या लांब कशा आलो याचे खूपच आश्चर्य वाटत होतं.

भुज मार्केटमध्ये गेलो. तिथे तर भरपूर दुकाने होती. तेथे महिलांनी मनसोक्त खरेदी केली. अनेक जणी म्हणाल्या, 'एवढी खरेदी आयुष्यात कधी केली नाही!' सामान एवढे झाले की पुण्याला कसे न्यायचे हेच कळेना. तिथल्या एका दुकानदाराने सुचवले म्हणून तेथूनच कुरियरने थेट पुण्यात पाठवले!

शेवटी निघण्यापूर्वी रामकृष्ण मठातील सरांना भेटायला गेलो तेव्हा त्यांनी आम्हाला गाई का पाळाव्यात, त्याचं काय महत्त्व आहे हे सगळे छान प्रकारे समजून सांगितले.

(पुढे चालू)

### ◈ कच्छ आणि गुजरातची अभ्यास सहल एक विलक्षण अनुभव ◈

१९ ते २३ डिसेंबर २०२२ या कालावधीत प्रबोधिनीमुळे कच्छला जाण्याची संधी मिळाली. ट्रेनच्या प्रवासामध्ये TC ने येऊन उठवण्यापासून ते एका रिक्षामध्ये १२ जणींनी सामान घेऊन एकत्र प्रवास करण्यापर्यन्त अनेक मजेशीर अनुभव घेतले. रामकृष्ण मठात रहाण्याची व जेवण्याची उत्तम सोय झाली. विवेकानंद इन्स्टिटयूटमध्ये चालण्याऱ्या वेगवेगळ्या कामांची माहिती मिळाली. सात वर्षे चालणारा बचत गट, ज्याची ठेव ७ लाखांपेक्षा जास्त आहे अशा गटाला भेटलो. गटातील महिलांच्या चेहऱ्यावरचे हसू पाहून खूप छान वाटले. निरनिराळ्या प्रकारच्या पर्सची उत्पादन करणारा कारखाना पाहता आला. सृजन ही अतिशय देखणी आणि व्यावसायिक संस्था पाहिली. भुजच्या परिसरात अनेक छोटे छोटे व्यवसाय चालतात ते पाहता आले. आपल्याकडे पण गावोगावी असे व्यवसाय सुरू झाले पाहिजेत. सहल गटातील महिलांशी निरनिराळ्या विषयावर संवाद साधता आला. घरी जाऊन आम्ही कोणाला सांगणार? इथे हसतोय घरी कुठे असे हसायला मिळते? प्रबोधिनीमुळे गुजरात पहायला मिळाले नाहीतर आम्हाला कोण दाखवतंय गुजरात? घरामध्ये साडीच नेसायला लागते, इथे आलोय म्हणून ड्रेस घालता आला. असे इतर विषयही मोकळेपणाने बोलता आले. घरातील विरोध आणि अनेक अडचणी मागे टाकून महिला अभ्यास सहलीला आल्या आणि एक नवीन दृष्टी घेऊन आपापल्या गावात परतल्या. सर्व सहलीचे नियोजन भारतीताई आणि सुनीताने अतिशय उत्तम पद्धतीने केले.

परतीचा प्रवास सुरू झाला. अनेक जणी या दौऱ्यामुळे पहिल्यांदाच रेल्वेत बसत होत्या. खूप खूप बघून झालं. गाडी कल्याणला पोचली आणि पुण्याला जाणारी गाडी तुडुंब भरून आली काही जणींना चढायची संधी मिळाली नाही. काही मिनिटांत घुसायचा सराव नव्हता..मिळेल त्या डब्यात बसावे हे त्या क्षणी सुचले नाही आणि तेवढ्यात गाडी सुटली..

आपल्या २ मैत्रिणी खाली राहिल्या आहेत हे कळायलाच वेळ लागला.... मग मात्र काळजी वाटायला लागली. त्यांना मोबाईलवर संपर्क करणे सुरु झाले पण तो पर्यन्त पुण्याला यायच्या दुसऱ्या गाडीत बसून त्या प्रवासाला लागल्या सुद्धा होत्या.. मग जीवात जीव आला. पुणे स्टेशनवर सगळ्या एकत्र उतरलो..

आता मात्र खरेच घरी जायची वेळ झाली. घराची ओढ होती पण तरी महिलांना घरी जावेसेच वाटत नव्हते. ५ दिवस कसे गेले कळलेच नाही. आता निरवा निरवी सुरू झाली, प्रत्येकीच्या बोलण्यात येत होते की त्यांना वाटते आहे, गावाकडे गेलो की छोटासा तरी उद्योग सुरू करावा. हे ऐकून अभ्यास दौरा यशस्वी झाला असेच वाटले!

⟐◈⟐

## *अर्थसखी*

सुवर्णा गोखले

अर्थसखी टप्पा २ हा १५ जूनला सुरू झाला. काम करत असणाऱ्या ८२ गांवांपैकी ४२ गांवांपर्यंत आपण सप्टेंबर पर्यंत पोचलो. ३६ गावातल्या ३६ अर्थसखी तयार झाल्या. करोना काळात शिकलेले झूम या प्रकल्पात वापरले गेले. दर आठवड्याला गावात प्रत्यक्ष काम करणाऱ्या अर्थसखीची झूम मिटींग घेतली जात होती. या बैठकीत कामासंबंधी प्रशिक्षण व्हायचे आणि केलेल्या कामाची निवेदने होत होती. यामुळे येणारी प्रत्येक छोटी–मोठी अडचण लक्षात येत होती. म्हणजे अख्ख्या गावात झेरॉक्सची सोय होत नसल्यामुळे झेरॉक्ससाठी बाजाराच्या गावात यायचेच तर एकातएक काम करायचे म्हणून लोक बाजाराच्या दिवशी यायचे. नेमका तो वार रविवार होता .. तेव्हा बाकी कामे व्हायची नाहीत अशा कामामुळे महिलांचे आर्थिक प्रवाहात येणे किती अवघड आहे असे आम्हाला समजत होते. तरीही नियमित बैठक होत असल्यामुळे गटाचा उत्साह वाढत गेला.

सुरुवातीला ३–४ कामे करायचे ठरवले होते जसे बँकेत बचत खाते काढायचे होते.. पण करायला लागल्यावर त्यासाठी पॅन कार्ड हवे, पॅन कार्ड काढायचे तर त्यासाठी आधार हवे, आधारवरचा मोबाईल क्रमांक अपडेट केलेला हवा. नुकतेच लग्न झालेली महिला असेल तर तिच्या नावाच्या पुराव्यासाठी मॅरेज सर्टिफिकेट हवे, म्हणजे ही सगळी कामे झाल्याशिवाय बँकेत साधे बचत खाते काढायची प्रक्रिया सुरु होणार नव्हती. खाते नसणाऱ्या बाईची बँकेत नेण्याची व्यवस्था केली तरी खाते निघणार नव्हते. मग ही कामे करायला सुरुवात केली. एकेक काम १–२ महिन्यांचे होते!

ग्रामीण महिलेने आर्थिक प्रवाहात येण्यासाठी रोटरी क्लबच्या आर्थिक मदतीने हा प्रकल्प ठरवला होता. रोटरीचे अधिकारी या अडचणी समजून घेण्यासारखे होते म्हणून ठीक पण बचत गटाचे काम एवढे वर्ष करूनही या व्यावहारिक अडचणींचे गांभीर्य लक्षात आले नव्हते.

अर्थसखी करताना अशीच एक अडचण लक्षात आली, की महिलांना एकत्र ऐकता येत होते पण प्रत्यक्ष काम करण्यापूर्वी ‘पैशाशी’ निगडीत काम असल्यामुळे काही प्रश्न वैयक्तिक विचारायचे होते. त्यानेही कामाची गती कमी होती. एकदा का सगळ्या निःशंक झाल्या की गटच्या गट कामाला लागत होते.

या निमित्ताने अनेकींनी आई–वडील, भाऊ–वाहिनी एवढ्यांचीच काय पण सासू–सासरे यांचीही कामे करून दिली. आपल्याला अशी कामे करायला उशीरच झाला असे पटल्यामुळे अर्थ सखींनी लहान मुलांची खाती काढणे, त्यांच्या नावाने बचत जमा करणे, असेही सुरू केले. पुढच्या पिढीचे शिक्षणही असे स्थानिक पातळीवर सुरू झाले ही खरी उपलब्धी.. आणि तसेच आपल्या प्रयत्नांमुळे जर मुलीच्या नावाने सुकन्या समृद्धी योजनेत खाते काढले तर ते चालू ठेवण्यासाठी प्रयत्न करत राहावे लागणार होते.

या प्रकल्पात विम्या बद्दल माहिती देऊन विमा काढणे असे करायचे होते. विमा पुरुषांचा काढतात ‘बाई’चा कशाला काढायचा, या प्रश्नापासून जागृतीला सुरुवात होती!

प्रकल्प कालावधीत ३,०३८ कामे केली. २०० पेक्षा जास्त कामे करणाऱ्या ५ जणी होत्या, १०० पेक्षा ८ जणींनी जास्त कामे केली. ठरवताना बँक खाते, विमा व स्वतःच्या पेन्शनची सोय अशी तीनच कामे ठरवली होती. प्रत्यक्षात त्यासोबत आधार–पॅन कार्ड संबंधी कामे, आवर्ती ठेव, PPF, सुकन्या समृद्धी योजनेत मुलींची खाती काढणे, निवडणूक ओळख पत्र, नव्याने बचत गटात येणे, ई–श्रम कार्ड काढणे, आभा मध्ये नोंदणी अशी बरीच कामे केली. अशी कामे करताना गावातला ‘बाईचा सन्मान’ वाढला हे नक्की!

चित्राली कुंभोजकर या अर्थशास्त्राच्या विद्यार्थिनीने ‘अर्थशास्त्र’ समजून घेण्यासाठी या प्रकल्पाचे अतिशय चांगले समन्वयन केले. त्यामुळे या अनुभवांवर एका आंतरराष्ट्रीय परिषदेत एक निबंध सादर करता आला.

# देणगीदार

**रुपये ५०० - ५,१००**

१) सुवर्णा गोखले
२) प्रतिमा जोशी
३) रवींद्र दिक्षित
४) श्यामा पुणेकर
५) वैजयंती कुलकर्णी
६) नंदिनी रानडे
७) आप्पा सूर्यवंशी
८) प्रज्ञा अगस्ती
९) राजेश्री क्षिरसागर
१०) अजय कदम
११) योगिनी जावकर
१२) उर्मिला आपटे
१३) मुक्ता साठे,
१४) अनघा जोशी
१५) प्रफुल्ला मुखवटे,
१६) जितेंद्र पैठणकर,
१७) राहुल तटके
१८) शिवानी पाटणकर

**चुलीसाठी रुपये ७,००० देणगी**

१) भूपेंद्र पाटणकर
२) पल्लवी चव्हाण
३) अमृता लिमये,
४) अथर्व गोंधळेकर
५) गौरी कोपर्डेकर
६) वैभव निवसरकर
७) चंद्रशेखर बिवलकर
८) माधुरी परळीकर
९) गायत्री सेवक,
१०) सुप्रिया क्षीरसागर,
११) शुभदा आळेकर,
१२) सुहास रायकर,
१३) स्वरूपा क्षीरसागर,
१४) ऋषिकेश लिमये,
१५) क्षमा क्षीरसागर,
१६) आशा अकोलकर
१७) डी.व्ही ब्रह्मे अंड सन्स २५,०००/-
१८) प्रज्ञा गोडबोले ४२,०००/-

**रुपये ५,१०० ते १०,०००**

१) चित्राली कुंभोजकर,
२) भारती आठवले,
३) रसिका गुप्ता,
४) केतकी पेंडसे,
५) अल्का पटवर्धन,
६) अचला फडके,
७) माधुरी परळीकर,
८) सुनीती तुळापुरकर,
९) श्रीराम ओक,
१०) लीना सोमण

**रुपये १०,५०० ते २५,०००**

१) सुचेता माइनकर,
२) संगीता देवकात्ये,
३) इनरव्हील क्लब, पुणे
४) चंदा पागे,
५) सुनिता भागवत,
६) इनर व्हिल क्लब ठाणे,
७) सीमा परांजपे,
८) सुनीती जोशी,
९) प्रज्ञा पैठणकर,
१०) अल्का निरंतर,
११) वर्षा पेंडसे,
१२) आरती काटकर
१३) सुरश्री नातू,
१४) प्रसन्ना परांजपे,
१५) सुहास जोशी,
१७) रवींद्र आपटे,
१८) आनंद विधाते

**रुपये ३०,००० ते ५०,०००**

१) विनायक खांदवे,
२) सायबेज आशा ट्रस्ट,
३) बेळांबे फौंडेशन,
४) प्रज्ञा गोडबोले,
५) डॉ. अपर्णा बेणारे,
६) दीप्ती मराठे,
७) कुंदा जोगळेकर,
८) महावतार बाबाजी तद्एकम फौंडेशन

**रुपये ८०,००० ते १,००,०००**

| | |
|---|---|
| १) मुक्ता गोखले | ८०,०००/- |
| २) संजय कुंटे | १,००,०००/- |
| ३) उज्वला कुंटे | १,००,०००/- |
| ४) सरीता भट | १,००,०००/- |
| ५) हेमलता प्रकाश काळे | १,००,०००/- |
| ६) सायबेज खुशबू ट्रस्ट (स्वयंरोजगार प्रशिक्षण) | १,११,६००/- |
| ७) कालिंदी काळे | १,२५,०००/- |
| ८) रोटरी क्लब ऑफ गांधीभवन, पुणे (अर्थसखी) | २,९०,०००/- |
| ९) हेल्थ एज टेक्नॉलॉजीज इंडिया प्रा. लि. | ३,००,०००/- |
| १०) सायबेज आशा | ३,०१,०००/- |
| ११) बोस्टन सायंटिफिक टेक्नॉलॉजी अँड इंजिनिअरींग सर्व्हि. प्रा. लि. | ५,००,०००/- |
| १२) अ‍ॅडोर डिजीट्रॉन (स्वयंरोजगार भांडवली खरेदी) | ५,३०,०००/- |
| १३) सायबेज आशा ट्रस्ट (स्वयंरोजगार प्रशिक्षण) | ५,५७,०८५/- |
| १४) ना. ग. परांजपे प्रतिष्ठान (वेल्हे निवास) | ७,००,०००/- |
| १५) हेमा अरुण निगवेकर | १०,००,०००/- |
| १६) कोफोर्ज बी. पी. एस्. | २२,९९,६७१/- |
| १७) कोफोर्ज बिझीनेस प्रोसेस सोल्युशन | ४०,००,०००/- |
| १८) ग्लोबंट इंडिया प्रा. लि. | ४०,००,०००/- |

**ज्ञान प्रबोधिनीला दिलेल्या देणग्या आयकर कायद्याच्या परि. ८० (जी) खाली करमुक्त आहेत.**

**'ज्ञान प्रबोधिनी' या नावाने धनादेश काढावा**

संपर्क : **ज्ञान प्रबोधिनी : स्त्री-शक्ती प्रबोधन (ग्रामीण),**
५१० सदाशिव पेठ, पुणे ४११ ०३० दूरभाष : (०२०) २४२०७१६२/१३३
★ **शिवापूर :** खेड-शिवापूर वाडा, ता. हवेली, जि. पुणे ४१२ २०५, ★ **नसरापूर :** ता. भोर, जि. पुणे
★ **आंबवणे :** मातृछाया, ता. वेल्हे, जिल्हा पुणे ★ **वेल्हे :** पोलिस स्टेशन जवळ, ता. वेल्हे, जिल्हा पुणे